## एम.बी.मोरे महीला महाविद्यालयाचा युवा महोस्तव २०१९ मध्ये सहभाग

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे महाविद्यालय आणि विद्यार्थी विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५२ वा आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धा 'युवा महोस्तव २०१९' मंगळवार, दि.०६ ऑगस्ट २०१९ रोजी पार पडला.

या महोस्तवात एम.वी.मोरे महीला महाविद्यालयाचे एकूण ३० विद्यार्थीनींनी विविध सांस्कृतिक कला प्रकारांमध्ये सहभाग नोंदवला. मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास कक्षाने नेमुन दिलेल्या नियमावलीनुसार ५ सांघिक आणि ११ वैयक्तिक सांस्कृतिक कला प्रकारांमध्ये एम.वी.मोरे महीला महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी आपले कौशल्य सादर केले आणि परिक्षकांनी वाहवा मिळविली.

एम.वी.मोरे महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी, तसेच सांस्कृतिक विभागप्रमुख सौ.दर्शना शिंदे आणि श्री. दिपेश भोसले यांनी अथक परिश्रम घेतले.